बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी पुकारलेल्या संपात सहभागी झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचा अनुपस्थितीचा कालावधी नियमित करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संघटना-१५२६/प्र.क्र.४१ /आरक्षण-१**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ मे, २०२६.

**<u>वाचा</u>** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः संघटना १५२६/प्र.क्र.४१/१६-अ, दि. २०.०४.२०२६.

**प्रस्तावना:-**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक २१ एप्रिल, २०२६ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप" आंदोलनासंदर्भाबाबत शासनास नोटीस दिली होती. सदर संपात कर्मचाऱ्यांनी सहभागी होवू नये असे आवाहन संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये करण्यात आले होते. तरीही संपामध्ये काही अधिकारी / कर्मचारी सहभागी झाले. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत आवश्यक तो सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर दिनांक २४.४.२०२६ रोजी बेमुदत पुकारलेला संप मागे घेण्यात आला. या संपात सहभागी झालेले जे शासकीय कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित होते त्यांची अनुपस्थिती नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक २१ एप्रिल, २०२६ ते दिनांक २४ एप्रिल, २०२६ या कालावधीत संप पुकारलेला होता. या संपामध्ये जे शासकीय कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांची अनुपस्थिती "अर्जित रजा" म्हणून नियमित करण्यात यावी. सदर बाब पुर्वोदाहरण म्हणून समजण्यात येऊ नये.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या [www.maharashtra.gov.in](http://www.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५२५१२२७४७०५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=257966df2620df1403d35023802519a4fbdcfcd894791eba41c2aef2b4c4b975, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B57FEE59F0E7101B822A49C72629C21BF9B4DC0BDE136817EE19B6B347E77F4, cn=SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2026.05.25 12:28:36 +05'30'

**(सुदाम आंधळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधान सभा, महाराष्ट्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधान परिषद /विधान सभा व राज्यातील संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१६. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा ), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती )त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त.
२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३. उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२५. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२६.निवड नस्ती (कार्यासन आरक्षण-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.